# पाल्सीग्रस्त मुलांसाठी सल्ला केंद्र

## मुकुल माधव फाउंडेशनतर्फे विशेष उपक्रम

**पुणे :** सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सर्वंकष आधार पुरविण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाउंडेशन साताऱ्यातील रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्ला केंद्र उघडणार आहे. येथे या मुलांना दूर-पुनर्वसन कार्यक्रमाचे लाभ घेता येतील तसेच पुण्यातील केईएम रुग्णालयात तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मिळविता येईल. बालमेंदूतज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी घोषणा मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी केली. सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेअरच्या वितरणप्रसंगी साताऱ्यात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमात एकूण पाच व्हीलचेअर्स, पाच कमोड व्हीलचेअर्स आणि एक सेरेब्रल पाल्सी खुर्ची देण्यात आली.




गरजू मुलांपर्यंत या सुविधा पोहोचाव्यात, यासाठी दुर्गम भागातील मुलांना या केंद्रापर्यंत येण्यासाठी वाहतुकीच्या सोई पुरविण्याचे आवाहन त्यांनी जिल्हा प्रशासनाला केले. या कार्यक्रमात काही सांस्कृतिक कार्यक्रम झाले. त्यात सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांनी भाग घेतला. या दृश्याने सर्व उपस्थित भावुक झाले.

मुकुल माधव फाउंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आतापर्यंत ७४ व्हीलचेअर्स आणि ५२ कमोड खुर्च्या भेट दिल्या आहेत. आणखी ३६ खुर्च्या जिल्ह्यातील विविध शाळांना भेट देण्यात येणार आहेत. मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, 'या मुलांना तसेच त्यांच्या मातांना पुण्यातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व समुपदेशन केले जाणार आहे. यामुळे परिणामकारक उपचार होण्यास मदत होणार आहे.'

### कार्यक्रमातील उपस्थित अतिथी

साताऱ्याचे छत्रपती खासदार उदयनराजे भोसले आणि त्यांच्या पत्नी छत्रपती दमयंतीराजे भोसले यांची उपस्थिती, हे या सोहळ्याचे आणखी एक आकर्षण ठरले. साताऱ्याचे जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्याम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, जिल्हा शिक्षणाधिकारी पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक फारोख कूपर आणि कूपर कॉर्पोरेशनचे सीईओ झाल कूपर, रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. परवेझ ग्रँट आणि केईएमच्या भारती पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

या कार्याचा मला अत्यंत आनंद होतो. आम्ही साताऱ्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये मुकुल माधव फाउंडेशनसाठी एक खास खोली ठेवली आहे. आमचे तज्ज्ञ व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे रुग्णांना मार्गदर्शन करतील.

\- डॉ. परवेझ ग्रँट

रितू छाब्रिया आणि त्यांचे कार्य हे मी पुण्यात असल्यापासून ओळखते. कोणत्याही अंतस्थ हेतूशिवाय आणि केवळ परोपकाराच्या भावनेने त्या हे उदात्त कार्य करीत आहेत. मुकुल माधव फाउंडेशन करीत असलेले कार्य कौतुकास्पद असून, प्रत्येकाने त्याला दाद द्यायला हवी. या कार्यामध्ये लागेल ती मदत देण्यास आम्ही तयार आहोत.

\- दमयंतीराजे भोसले